श्री. मधुकरराव गुळवणी

मनाचा तळ गाठणारे गाणे

नागपुरातील ज्येष्ठ संगीतज्ञ श्री. मधुकरराव गुळवणी यांचं नुकतंच वयाच्या ७३ व्या वर्षी निधन झालं. नागपुरातलं संगीत ज्या मोजक्या व्यक्तींमध्ये सुरक्षित्त होतं, अशा मागच्या पिढीतले मधुकरराव गुळवणी हे एक परिचित नाव होतं.

आकाशवाणीच्या सेवेतून निवृत्त झाल्यानंतर गुळवणींचं घर नागपुरात असलं, तरी मूळचे ते इंदोरचे होते. गाण्यातली व्यक्ती इंदोर-देवासकडची की, त्यांच्यात कुमार गंधर्व आपोआप नकळत दिसू लागतात. त्या मातीचा ता गुण आहे, असा माझा समज आहे. मधुकरराव गुळवणी हे कै. रामभाऊ गुळवणींचे पुत्र. कुमारांच्या 'सावरत्या' वयात सावलीसारखे त्यांच्या अवतीभोवती राहिले होते, त्यामुळे कुमार गंधर्व हा त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक होता.

पं. कुमार गंधर्व आणि त्यांच्या गायकीवरचं लोकांचं प्रेम बहुदा दोन टोकांकडचं असलेलं दिसतं. काहींना कुमारांचं गाणं अनाकलनीय, अनिर्बंध म्हणून आवडत नाही; तर काहींना ते याच कारणांसाठी खूप आवडतं. कुमारांच्या गायकीत काहींना परंपरा मोडल्याचं पाप दिसतं, तर काहींना तीच गायकी खऱ्या अर्थाने परंपरा जतन करणारी वाटते. एखाद्या कलाकृतीत काय शोधावं आणि त्याचा आनंद कसा घ्यावा, हीही प्रत्येकाची स्वतंत्र आवड असते. एवढं मात्र खरं की, कुमारांचं गाणं आवडणाऱ्यांचा, त्यांच्या गाण्याच्या चाहत्यांचा एक खास असा गोतावळा आहे. खास अशासाठी की, या गोतावळ्यातले चाहते कमीजास्त प्रमाणात एकमेकांनाही ओळखतात. 'कुमारप्रेम' ह्या सूत्रानं ते एकमेकांशी जुळलेले असतात. गुरू-शिष्य परंपरेत 'गुरुबंधू' हे एक अनोखं नातं आहे. एका गुरूचे सगळे शिष्य एकमेकांचे गुरुबंधू असतात. ह्या बंधुत्वाला तालमीची, वयाची समंजीची अट नसते. एखाद्या गायकाच्या चाहत्यांच्या श्रोतापरंपरेतही असा बंधुत्वाचा धागा जाणवतो, हे कुमार गंधर्वांच्या संदर्भात मी अनुभवलं आहे.

गुळवणीकाका कुमारांचे चाहते होते. कुमारांचे अभ्यासक, चिकित्सक होते. कुमारांच्या गाण्याचा भरपूर संग्रह त्यांच्याजवळ होता. दहा वर्षांपूर्वी एका 'कुमारप्रेमी' गायकाने

माझी गुळवणीकाकांशी ओळख करून दिली. ती आज इतकी वर्षे त्याच सूत्राभोवती असली, तरी त्याच्या कक्षा मात्र विस्तारल्या होत्या.

१९९३ सालातली ही गोष्ट. श्री. अरुण दाते यांच्या मुलाखतीत त्यांनी एका गज़लचा उल्लेख केला होता. 'बहजाद लखनवींची ही गज़ल पं. कुमार गंधर्वांनी संगीतबद्ध केली आणि मला शिकवली,' असा तो उल्लेख होता. कुमारगंधर्व आणि उर्दू गतरी ही जोडी मला अफलातून नवीन वाटली. याच गज़लेचा धागा पकडून मी श्री. अरुण दातेंना ती शिकवण्याची विनंती केली आणि ती गज़ल त्यांनी मला शिकवलीही. बहजाद लखनवींच्या अप्रतिम काव्याला कुमारांच्या अप्रतिम जागांनी सजवलं होतं. या जागांना अरुण दात्यांच्या आवाजानी आणखी तरल बनवलेलं होतं. कुमार गंधर्वांच्या मोठेपणाला दाद देता देता अचानक दात्यांनी मला विचारलं, "गुळवणींना भेटलांत का कधी?" मी तेव्हा नागपुरात अगदीच नवीन असले तरी गुळवणींची कुमारांशी असलेली जवळीक मला माहीत होती. त्यांच्याजवळच्या कुमारांच्या रेकॉर्डिंगच्या खजिन्याचा सुगावा मला लागला होता.

मी "नाही" असं उत्तर दिलं. कारण तोपर्यंत त्यांच्या जाणकारी, चोखंदळपणा याबद्दल जितकं ऐकलं होतं त्यापेक्षाही त्यांच्या स्वभावाची चर्चा जास्त ऐकली होती. त्यांच्या, 'दारात उभं' ही न करणाऱ्या स्वभावाबद्दल कानावर आलं होतं. त्यामुळे घरी जाण्याचं धाडस मी केलं नव्हतं. 'अशा दारातून' राजमार्गानं प्रवेश करण्याची माझी इच्छा, "चला मी नेतो तुम्हाला. आपण जाऊ या," असं म्हणून श्री. अरुण दात्यांनीच पूर्ण केली. "ही साधना, कुमारांवर अभ्यास करतेय" आणि "हे गुळवणी! माझा लहानपणापासूनचा सततचा मित्र. कुमार आणि बालगंधर्व ह्यांच्याकडून हवे तितके ऐका नि समजावून घ्या." अशी सरळ प्रेमाची हक्काची सूचक ओळख त्यांनी करून दिली. तेव्हापासून कुमारांबद्दल बोलण्यात आणि कुमार ऐकवण्यात गुळवणी काकांनी मला कधीच निराश केलं नाही.

काका कुमारांचे चाहते होते. त्यांच्या बोलण्यात कुमार हाच विषय असायचा. कुमारांच्या गाण्याइतकाच कुमार या व्यक्तीवर जीव होता. कुमारांबद्दल बोलायला त्यांना खूप आवडत असलं, तरी व्यक्तिसंग्रहाबद्दल ते खूपच चोखंदळ होते. कुमारांच्या गाण्याबद्दल बोलायला उत्सुक असले, तरी कुमारांशी विनाकारण 'सलगी' दाखवणाऱ्यांना ते दूर ठेवत. कुमारांचं गाणं समजण्याची कुवत नसली, त्यांच्याबद्दल नुसतं दिखाऊ प्रेम असलं तर त्याच्याशी फारसं बोलण्याचीही तसदी ते घेत नसत.

काकांनी मला कुमार खूप ऐकवले. कुमारांचा भटियार ऐकवला, जैतकल्याण, भूप, तिलककामाद ऐकवला, अभंग ऐकवले, मराठी-हिंदी भजनं ऐकवली. नुसतेच ऐकवले नाहीत, तर ते समजावूनही सांगितले. कुमारांचं कॅसेटमधलं गाणंही आम्ही, * एखादी मैफल सुरू असावी तसं ऐकायचो. दाद, वाहवा दिली जायची. शांतपणे पूर्ण कॅसेट ऐकली की नंतर कॅसेट मागेपुढे करून त्यातल्या खुब्या ते `समजावून सांगायचे. कुमारांवरचे ज्येष्ठांचे इम्पॅक्ट्स समजावून सांगायचे. बालगंधर्वांची जागा कुमारांनी बघ कशी फिरवलीय, असं म्हणून कुमारांचा ढंग, कुमारटच म्हणजे काय ते खुलवून सांगायचे. मग पुन्हा एकदा कॅसेट लावून सलगपणे त्या जागांना हेरलं, टिपलं जायचं.

अशाच एका जमलेल्या बैठकीत गप्पांमध्ये धुनउगम रागांची निर्मितिकथा समजावताना काकांनी गारा रागातली धून 'मन लागेना'च्या कितीतरी उपजा आणि त्याचे विस्तार गाऊन दाखवले होते. एखाद्या लोकधुनेचा राग बनण्याकडे होत असलेल्या प्रवासाचं त्यांचं विश्लेषण मार्मिक होतं.

कुमारांचं गाणं ऐकायला काकाही कधीकधी माझ्या घरी येत असत. कुमारांच्या जन्मदिनी आणि स्मृतिदिनी मी आवर्जून त्यांच्याकडे जात असे. काकांच्या घरात दाराच्या अगदी समोरच्या भिंतीवर पं. निवृत्तीबुवा सरनाईकांचा फोटो आहे. उजवीकडे छोट्या फ्रेममध्ये टीपॉयवर कुमार असायचे. कुमारांच्या स्मृतिदिनी त्या फ्रेमसमोर एखादं फूलही असायचं. त्या दिवशी काय ऐकायचं, हे काकांनी आधीपासून ठरवलेलं असायचं. त्या दिवशी चर्चा व्हायची नाही, वाहव्वा दाद नसायची. मधेमधे डोळ्यांच्या पाणावलेल्या कडा, काका पुसत असत, एवढंच.

काकांसारखी अनेक व्यक्तिमत्त्वे सर्वच क्षेत्रात असतात. वरवर ती स्पष्टवक्ता, फटकळ, काहीशी * विक्षिप्त वाटत असली तरी त्यामागे सच्चेपणा असतो. हळवं, संवेदशील मन असतं. जागृत, चिकित्सक, अभ्यासू दृष्टी असते. अशा व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्यासाठी धीर, वेळ आणि क्वचित कष्टाची तयारी ज्यांच्यापाशी असेल त्यांनी ती अवश्य अनुभवावीत. अन्यथा जगात सर्वसामान्य व्यक्तींची कमतरता नाही.